**वस्त्रोद्योग विभागांतर्गत ई-प्रशासन प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) गठीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.५४/टेक्स-४**
१४ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ०७ ऑक्टोबर, २०२६

**वाचा :**

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीओएम १००१/प्र.क्र.१७४/०१/३९, दि.२९.१०.२००१.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सववि-३५१०/प्र.क्र.६७२/आस्था-१, दि.२४.०८.२०११.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मातंस/२०११/प्र.क्र.१२५/३९, दि.२३.०९.२०११.
४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सववि-३५११/प्र.क्र.४४१/आस्था-१, दि.३०.०८.२०१२.
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम, दि.११.०८.२०२६.
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (मातं), क्र.HPC-2026/C.R.27/IT, दि.२७.०२.२०२६.
७) अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.शाकानि-२०२६/प्र.क्र.३२/रवका-१, दि.१४.०८.२०२६.

**प्रस्तावना :-**

शासकीय विभाग/कार्यालयातील कामकाजाचे कामकाजाचे संगणकीकरण करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये सर्वसमावेशक कार्यपद्धती विहीत करण्यात आली असून प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांतर्गत संगणकीकरणाचे प्रकल्प राबविण्याकरीता प्रत्येक प्रशासकीय विभागांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग विभागांतर्गत ई-प्रशासन प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी प्रधान सचिव (पणन) यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत करण्यात आली होती. तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.७ येथील अधिसूचनेनुसार मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना करण्यात आली असून सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग या तीन विभागांमध्ये विभाजन करण्यात आले आहे. त्या

अनुषंगाने आता वस्त्रोद्योग विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांतर्गत संगणकीकरणाचे प्रकल्प राबविण्याकरिता सचिव (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली नव्याने "प्रकल्प अंमलबजावणी समिती" गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

वस्त्रोद्योग विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांतर्गत संगणकीकरणाचे प्रकल्प राबविण्याकरिता खालीलप्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee) गठीत करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे पदनाम | समितीवरील पद |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वस्त्रोद्योग विभाग | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त) अथवा त्यांचे प्रतिनिधी, वित्त विभाग | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नियोजन) अथवा त्यांचे प्रतिनिधी, नियोजन विभाग | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (उद्योग) अथवा त्यांचे प्रतिनिधी, उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभाग | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (माहिती तंत्रज्ञान) अथवा त्यांचे प्रतिनिधी, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग | सदस्य |
| ६ | सह/उपसचिव (टेक्स-४), वस्त्रोद्योग विभाग | सदस्य-सचिव |

२. प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकांसाठी उपरोक्त सदस्यांसह विभागातील/ /विभागाच्या अधिनस्त कार्यालयातील/अन्य विभागातील अधिकारी, विशिष्ट क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती यांना आवश्यकतेनुसार समिती निमंत्रित करु शकेल.

३. उपरोक्त समितीस ई-प्रशासन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ते हार्डवेअर/सॉफ्टवेअर उपलब्ध करण्याकरिता सल्लागार/पुरवठादाराची निवड व इतर अनुषंगिक बाबी याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार तसेच, सामान्य प्रशासन (मातं) विभागाच्या संदर्भाधीन क्र.६ येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार ₹१० लाखापेक्षा जास्त व ₹५ कोटीपेक्षा कमी खर्चाच्या माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्पास मान्यता देण्याचे अधिकार असतील. ₹५ कोटीपेक्षा जास्त ते ₹१०० कोटीपर्यंतचे अधिकार मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीस राहतील. तसेच, ₹१०० कोटीपेक्षा जास्त रकमेच्या माहिती तंत्रज्ञान विषयक खर्चाचे सर्व प्रस्ताव प्रथम उच्चाधिकार समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावेत. उच्चाधिकार समितीच्या शिफारशीनंतर सदर प्रस्तावास मा.मंत्रिमंडळाची मान्यता आवश्यक राहिल.

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम, दि.११.०८.२०२६ च्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन, अ.क्र.४, परिच्छेद क्र.२७ (२)(अ) नुसार प्रकल्प अंमलबजावणी समितीने मान्यता दिलेल्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार वस्त्रोद्योग विभागास राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१००७१५२३१२६४३६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PAWAR TUSHAR PITAMBAR
Date: 2026.10.07 15:24:11 +05'30'

**(डॉ.तुषार पवार)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सचिव (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व उपसचिव, वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती (टेक्स-४).